सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**-: आदेश :-**

क्र.पोमसं/२/१०२०/नि.नि.सू.-२०२५/८३/२०२५ दिनांक :- ३०/०६/२०२६

**संदर्भ :-** शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-०१२६/प्र.क्र.३५/(भाग-२)पोल-१ अ, दि. ३०/०६/२०२६ (प्रत संलग्न)

**विषय :-** **नियमित निवडसुची, २०२५-२६**
पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.

* * * * *

पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सन २०२५-२०२६ च्या निवडसूचीवरील ०२ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीवरील पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत :-

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

**अ.** उपरोक्त शासन आदेशांत नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी.

**आ.** पदोन्नती प्राप्त पोलीस निरीक्षकांच्या नावांसमोरील नमूद सध्याच्या नियुक्ती ठिकाणी काही बदल झालेला असेल तरी सदर अधिकारी सध्या ज्या ठिकाणी कार्यरत असेल त्या घटक प्रमुखांनी पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे.

**इ.** सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिकाऱ्यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरूध्दच्या प्रलंबित/प्रस्तावित विभागीय /न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

१) शिक्षा प्रस्तावित / चालू झाली असल्यास

२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास

३) दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास

४) निलंबित असल्यास, इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

**ई.** ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही मा.न्यायालयाचे, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सदर आदेशान्वये पदस्थापना झाली असेल तर अशा

मा.न्यायालयीन आदेशाची अवमान्यता होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी. अशी प्रकरणे उद्भवल्यास त्यांचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

उ निवडणूकीची आदर्श आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ऊ वरील बाबी लक्षात घेऊन घटक प्रमुखांनी पदोन्नत पोलीस निरीक्षकांना त्यांच्या नावासमोरील नमूद पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रतिक्षेविना तात्काळ कार्यमुक्त करावे.

**मा. पोलीस महासंचालकांनी सर्व पदोन्नत अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.**

**( सुप्रिया पाटील यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता

प्रति,
महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, ठाणे शहर /नवी मुंबई

प्रत सादर :-
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक,मुंबई-३२
**(लक्षवेध :-** सुग्रिव धपाटे, सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन)
महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.

प्रत :-
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (सस्नेह)
सर्व संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३, ९, ११, १४अ, ३६, ४०
संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. सदरचे आदेश www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर पोलीस निरीक्षक (नि:शस्त्र) ते पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना या शिर्षाखाली पुढील ३० दिवसासांठी प्रसिध्द करण्यात यावेत.

नियमित निवडसूची, २०२५-२६: (भाग-२)

*"पोलीस उप अधीक्षक/ सहा. पोलीस आयुक्त (नि:शस्त्र)" या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.*

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन आदेश क्र.रापोसे-०१२६/प्र.क्र.३५ (भाग-२)/पोल-१अ.**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०००३२.

दिनांक : ३० जून, २०२६.

संदर्भ :- १) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र.१५९/ कार्या.-१२, दिनांक ०१.०८.२०१९.

२) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाची पत्रे क्र.पोमसं/२/१०२०/नि.नि.सू-२०२५/८३/२०२५, दिनांक १८.०३.२०२६

४) शासन पत्र, गृह विभाग, क्र. रापोसे-०१२६/प्र.क्र.३५/पोल-१अ, दिनांक १९.०६.२०२६.

५) पोलीस महासंचालक कार्यालय यांचे क्र.पोमसं/२/१०२०/नि.नि.सू-२०२५/८३/२०२५, दिनांक २३.०६.२०२६

**शासन आदेश.**

"पोलीस उप अधीक्षक/ सहा. पोलीस आयुक्त (नि:शस्त्र)" या संवर्गातील पदावर पदोन्नती देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या "पोलीस निरीक्षक (नि:शस्त्र)" या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या "नियमित निवडसूची २०२५-२६(भाग-२)" यामध्ये समाविष्ट असलेले, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद पोलीस अधिकारी यांना, "पोलीस उप अधीक्षक/ सहा. पोलीस आयुक्त (नि:शस्त्र)" या संवर्गातील पदावर सेवाज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात, पुढील अटींवर, पदोन्नती देण्यात येत असून, त्यांची स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट पदावर, याद्वारे, पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सद्याची नियुक्ती | पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | विजय शिवराम पांचाळ | ला.प्र.वि. सिंधुदुर्ग (एटप) | अपर पोलीस अधीक्षक (एटप), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई. |
| २. | भास्कर हंबीरराव कोकरे | नवी मुंबई | सहायक पोलीस आयुक्त, ठाणे शहर. |

**अटी:-**

१) उक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) उक्त पदोन्नती ही शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा *(regularization)* व सेवाज्येष्ठतेचा *(seniority)* कोणताही हक्क असणार नाही.

४) उक्त निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याच्या अधीन तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/न्यायालय यांचे आदेश, निवडणुकीची आदर्श आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, इत्यादी लक्षात घेऊन पुढील उचित कार्यवाही करावी.

३. हा शासन आदेश, सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२न यामध्ये निर्दिष्ट सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६३०१९१०००७१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2026.06.30 19:10:51 +05'30'

(सुग्रिव धपाटे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
२) पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
३) अपर पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संबंधित पोलीस अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).*
५) निवड फाईल, पोल-१अ.

प्रत-

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/ लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४) जिल्हा कोषागार अधिकारी ठाणे.